आदिवासी क्षेत्र उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना
२०११-२०१२ चे योजनानिहाय अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप
" जलसंपदा "

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्र.बीयुडी-२०११/प्र.क्र.२२/का.६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१ जून, २०११.

वाचा : १) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.लेखानु -२०.११/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प-३, दि.३१.३,२०११
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.लेखानु -२०.११/प्र.क्र.३७/अर्थसंकल्प-४, दि.८.४,२०११
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अंदाज २०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि.६ मे, २०११
४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक टिएसपी-२००८/प्र.क्र.६/का.६, दि.१६.१२.२००९

शासन निर्णय :- आदिवासी उपयोजनांतर्गत **"जलसंपदा"**या उपशिर्षाखाली सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेल्या तरतुदीचे योजनानिहाय व जिल्हानिहाय वाटप आणि प्रत्येक योजनांचे नियंत्रण अधिकारी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविले आहेत. आता "महाराष्ट्र विनियोजन विधेयक सन २०११" (महाराष्ट्र विनियोजन (लेखाअनुदान) अधिनियम,२०११ यांच्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विर्निदिष्ट करण्यात आलेल्या रक्कमांसह) यास विधानमंडळाने मंजूरी दिलेली असून महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी त्यास अधिसंमती दिलेले आहे, आणि ते २०११ चा अधिनियम क्रमांक १७ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग ८ दिनांक २१.४.२०११ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले असल्यामुळे आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील उपयोजनेच्या सन २०११-१२ करीता या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय व योजनानिहाय तरतूदी वितरीत करण्यास तसेच खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. तसेच सदर खर्च मासिक निधी विवरणपत्रानुसार खर्च करावा. मासिक विवरणपत्रानुसारचा निधी एप्रिल ते डिसेंबर या कालावधीमध्ये पुढे-मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पिय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.त्याचप्रमाणे सर्व नियंत्रक अधिकारी / अंमलबजावणी अधिकारी यांनी सदर तरतूदी खर्च करतांना वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अंदाज २०११/प्र.क्र.९३/अर्थसंकल्प-३, दि.६ मे, २०११ च्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. वित्तीय वर्ष सन २०११-१२ च्या प्रथम नऊमाही करीता आवश्यक असणारा योजनेतर व योजनांतर्गत अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ७५ टक्केच्या मर्यादेत अर्थसंकल्पिय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीद्वारे वितरित केला जाईल. डिसेंबर अखेर खर्चाचे प्रमाण ६५ टक्केपेक्षा कमी असल्यास याप्रमाणात सुधारित अंदाजात कपात करण्यात येईल. सुधारित अंदाज सन २०११-१२ मंजूर करताना प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाणातच मंजूर केले जातील याची नोंद घ्यावी.

४. नियंत्रण अधिकारी आणि विभागप्रमुख यांनी ही तरतुद शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का.५ दिनांक ९.३.१९९० अन्वये निश्चित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी मान्य योजनांवर खर्च होतील याची दक्षता घ्यावी. तसेच या तरतूदी खर्च करतांना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.टिएसपी-२००३/प्र.क्र.१०१/का-६, दिनांक २६ जुलै, २००४ व टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का-६, दिनांक १० नोव्हेंबर, २००५ मधील अटींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरित करण्यात येत असलेल्या तरतूदी मासिक खर्च विवरणपत्राप्रमाणे खर्च करण्याची दक्षता सर्व नियंत्रक अधिका-यांनी घ्यावी.

५. आदिवासी उपयोजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लोकांकरिता वा आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लोकांकरिता खर्च करण्यात यावी. आदिवासी उपयोजनेंतर्गत केलेली तरतूद आदिवासी क्षेत्राबाहेर किंवा सर्वसाधारण योजनेखाली खर्च करण्यात येवू नये. जर आदिवासी उपयोजनेत केलेली तरतूद खर्च झाली नाही तर सदर तरतूद प्रत्यार्पित करावी व कोणत्याही

परिस्थितीत आदिवासी क्षेत्राबाहेर खर्च करण्यात येवू नये. जर आदिवासी उपयोजनेची तरतूद आदिवासी क्षेत्राबाहेर खर्च झालेली आढळल्यास याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास, संबंधित जिल्हाधिकारी व नियोजन अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल. तसेच आदिवासी उपयोजनेंतर्गत जिल्हा योजनांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल लेखाशिर्षनिहाय/उप लेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती जिल्हाधिकारी तसेच नियोजन अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व आदिवासी विकास विभागस प्रत्येक महिन्यात १० तारखेपर्यंत न चुकता पाठवावी.

६. विभागाच्या दिंनाक १६ डिसेंबर, २००९ च्या शासन निर्णयाव्दारे जिल्हास्तरीय योजना जिल्हाधिकारी यांच्याकडे राबविण्यासाठी देण्यात आल्या आहेत. जिल्हा योजनांसाठी प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले असल्यामुळे योजनेसाठी केलेली तरतूद त्याच योजनेवर त्याच जिल्ह्यात खर्च करणे बंधनकारक राहिल. त्यानुसार जिल्हा योजनेसाठी केलेली तरतूद जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली आहे. तथापि, हाती घेण्यात येणारी कामे संबंधित विभागातील क्षेत्रिय अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, आयुक्त,आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांचेशी चर्चा करुन निश्चित करावी. प्रगतीपथावरील (ongoing works) कामांपैकी ज्यामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त खर्च झालेला आहे त्यांच्यावर खर्च करावा. अपवादात्मक परिस्थितीत अशी कामे ज्यावर ५० टक्के पेक्षा कमी खर्च झालेला आहे व त्यास पूर्ण करणे गरजेचे आहे त्याबाबत शासनाची पूर्व परवानगी घेऊन पुढील कार्यवाही करावी. तसेच जिहास्तरीय योजनेतील कामांची तपासणी कंरण्याचे अधिकार व जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी तसेच प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त व आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांची संयुक्तीकरित्या राहिल.

७. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजने क्षेत्राबाहेरील क्षेत्रातील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल व तो केंद्रशासनाला कळविता येईल.

८. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख यांनी नियम प्रचलित कार्यपध्दती व सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन चालू योजनांवर खर्च करावा. हे आदेश फक्त अंमलबजावणी /नियंत्रक अधिका-यांच्या अधिनस्त ठेवलेल्या तरतुदीस प्रशासकीय दृष्टया मान्य केलेल्या चालू योजनांवर खर्च करण्यासाठी आहे. याची अंमलबजावणी अधिका-यांनी नोंद घ्यावी.

९. आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्र उपयोजना (टिएसपी) व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (ओटिएसपी) यांचा खर्च स्वतंत्रपणे नोंदविण्यासाठी लेखाशिर्षामध्ये काही बदल करण्यात आले असल्यास हे बदल लक्षात घेवून खर्च नोंदविताना सुधारित लेखाशिर्ष नोंदविण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा **संगणक सांकेतांक २०११०६२११३५६३६००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श. र. सावंत)
कार्यासन अधिकारी

प्रति,

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/नागपूर/ठाणे/अमरावती.
विभागीय आयुक्त,मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ , नाशिक /गडचिरोली /अमरावती /नंदुरबार
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद , नाशिक /गडचिरोली /अमरावती /नंदुरबार
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
आयुक्त , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक /गडचिरोली /अमरावती /नंदुरबार
मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी, जिल्हा परिषद , नाशिक /गडचिरोली /अमरावती /नंदुरबार

महालेखापाल (१ / २), लेखापरिक्षा / लेखाअनुज्ञयेता, मुंबई / नागपूर (३ प्रती)
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
पाटबंधारे विभाग (बजेट-२/लेखाशाखा), मंत्रालय, मुंबई - ३२
अधिक्षक अभियंता तथा संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास, पुणे
कार्यकारी अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
कार्यकारी अभियंता, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
कार्यकारी अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
प्रादेशिक मुख्य अभियंता, पाटबंधारे मंडळ, मुंबई/पुणे/नागपूर/अहमदनगर
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे (२ प्रती)
कार्यासन अधिकारी (का.क्र. २, ५) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय.
निवड नस्ती (का-६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.

आदिवासी क्षेत्र उपयोजनेखालील सन २०११-१२ चे जिल्हानिहाय अंदाजपत्रकीय तरतूदीचे वाटप

(रुपये हजारात)

शिर्ष : लघुपाटबंधारे **योजनेचे नांव : लघुपाटबंधारे कामाचे अन्वेषण व सर्वेक्षण**		**मागणी क्रमांक टी-५** मुख्य लेखाशिर्ष : २७०२-लघुपाटबंधारे-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-०१-भुपृष्ठ जल-७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०१) इतर लहान पाटबंधा-यांची कामे (राज्यक्षेत्र) सर्वेक्षणाचे कामे **(२७०२ ३६८७) ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)**		
जिल्ह्याचे नांव	**२०११-१२ साठी केलेली तरतूद**	**अर्थसंकल्पीय तरतूद सुपूर्द करण्यात आलेला नियंत्रण अधिकारी**	**प्रशासकीय विभाग**	**शेरा**
१	**२**	**३**	**४**	**५**
ठाणे	७२७२७	संबंधित जिल्हाधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	
नाशिक	६३६४			
अहमदनगर	९१			
एकूण	**७९१८२**			

टीप : बांधकामावरील टक्केवारी खर्च वगळण्यात आला आहे.

आदिवासी क्षेत्र उपयोजनेखालील सन २०११-१२ चे जिल्हानिहाय अंदाजपत्रकीय तरतूदीचे वाटप

(रुपये हजारात)

शिर्ष : लघुपाटबंधारे **योजनेचे नांव : विस्तार व सुधारणा.**		**मागणी क्रमांक टी-५** मुख्य लेखाशिर्ष : २७०२-लघुपाटबंधारे-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-०१-भुपृष्ठ जल-७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०२) स्वेच्छाधीन अनुदाने (विस्तार व सुधारणा) **(२७०२ ३६९६) ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)**		
जिल्ह्याचे नांव	**२०१०-११ साठी केलेली तरतूद**	**अर्थसंकल्पीय तरतूद सुपूर्द करण्यात आलेला नियंत्रण अधिकारी**	**प्रशासकीय विभाग**	**शेरा**
१	**२**	**३**	**४**	**५**
ठाणे	४५४५४	संबंधित जिल्हाधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.	
अमरावती	२२७३			
एकूण	**४७७२७**			

टीप : बांधकामावरील टक्केवारी खर्च वगळण्यात आला आहे

आदिवासी क्षेत्र उपयोजनेखालील सन २०११-१२ चे जिल्हानिहाय अंदाजपत्रकीय तरतूदीचे वाटप

(रुपये हजारात)

शिर्ष : लघुपाटबंधारे **योजनेचे नांव : लघुपाटबंधारे योजना (तापी पाटबंधारे महामंडळाअंतर्गत येणा-या प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देणे)**		**मागणी क्रमांक टी-६** मुख्य लेखाशिर्ष: ४७०२-लहान पाटबंधारे भांडवली खर्च-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-८०-सर्वसाधारण -७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०१) तापी पाटबंधारे विकास महामंडळाला भाग भांडवली अंशदान **(४७०२ ४९७२) ३२-अंशदाने**		
जिल्हयाचे नांव	**२०११-१२ साठी केलेली तरतूद**	**अर्थसंकल्पीय तरतूद सुपूर्द करण्यात आलेला नियंत्रण अधिकारी**	**प्रशासकीय विभाग**	**शेरा**
१	२	३	४	५
नाशिक	५१५०	संबंधित जिल्हाधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	
एकूण	**५१५०**			

आदिवासी क्षेत्र उपयोजनेखालील सन २०११-१२ चे जिल्हानिहाय अंदाजपत्रकीय तरतूदीचे वाटप

(रुपये हजारात)

शिर्ष : लघुपाटबंधारे **योजनेचे नांव : लघुपाटबंधारे योजना (कोकण पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत येणा-या प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देणे)**		**मागणी क्रमांक टी-६** मुख्य लेखाशिर्ष: ४७०२-लहान पाटबंधारे भांडवली खर्च-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-८०-सर्वसाधारण -७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०२) कोकण पाटबंधारे विकास महामंडळाला भाग भांडवली अंशदान **(४७०२ ४९८१) ३२-अंशदाने**		
जिल्हयाचे व प्रकल्पांचे नांव	**२०११-१२ साठी केलेली तरतूद**	**अर्थसंकल्पीय तरतूद सुपूर्द करण्यात आलेला नियंत्रण अधिकारी**	**प्रशासकीय विभाग**	**शेरा**
१	२	३	४	५
नाशिक	३०९००	संबंधित जिल्हाधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	
एकूण-	**३०९००**			

आदिवासी क्षेत्र उपयोजनेखालील सन २०११-१२ चे जिल्हानिहाय अंदाजपत्रकीय तरतूदीचे वाटप

(रुपये हजारात)

शिर्ष : लघुपाटबंधारे **योजनेचे नांव : लघुपाटबंधारे योजना (गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत येणा-या प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देणे)**		**मागणी क्रमांक टी-६** मुख्य लेखाशिर्ष: ४७०२-लहान पाटबंधारे भांडवली खर्च-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-८०-सर्ववसाधारण -७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (१२) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाला भाग भांडवली अंशदान **(४७०२ ५०१२) ३२-अंशदाने**		
जिल्हयाचे व प्रकल्पांचे नांव	**२०११-१२ साठी केलेली तरतूद**	**अर्थसंकल्पीय तरतूद सुपूर्द करण्यात आलेला नियंत्रण अधिकारी**	**प्रशासकीय विभाग**	**शेरा**
१	**२**	**३**	**४**	**५**
नाशिक	१५४५०	संबंधित जिल्हाधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	
एकूण	**१५४५०**			

आदिवासी क्षेत्र उपयोजनेखालील सन २०११-१२ चे जिल्हानिहाय अंदाजपत्रकीय तरतूदीचे वाटप

(रुपये हजारात)

शिर्ष : लघुपाटबंधारे **योजनेचे नांव : कोल्हापूर पध्दतीचे बंधारे (विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत येणा-या प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देणे)**		**मागणी क्रमांक टी-६** मुख्य लेखाशिर्ष: ४७०२-लहान पाटबंधारे भांडवली खर्च-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-८०-सर्ववसाधारण -७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०५) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला भाग भांडवली अंशदान **(४७०२ ५१४६) ३२-अंशदाने**		
जिल्हयाचे व प्रकल्पांचे नांव	**२०१०-११ साठी केलेली तरतूद**	**अर्थसंकल्पीय तरतूद सुपूर्द करण्यात आलेला नियंत्रण अधिकारी**	**प्रशासकीय विभाग**	**शेरा**
१	**२**	**३**	**४**	**५**
अमरावती	२५००	संबंधित जिल्हाधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	
एकूण	**२५००**			